महिला आरक्षणाचे टेन्शन

विद्यमान नगरसेवकांची अडचण वाढणार

वार्ताहर/ठाणे

ठाणे महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका या तीन सदस्यीय पध्दतीने होणार आहेत. मागील निवडणुकीत चार सदस्यीय पध्दतीने या निवडणुका झाल्या होत्या. आता प्रभाग रचनेचा प्रारुप आराखडा सादर झाल्यानंतर अनेकांचे अवसान आधीच गळाले आहे. त्यात आता आरक्षण कसे पडणार, याची उत्सुकता इच्छुकांमध्ये शिगेला गेली आहे. दरम्यान तीनमध्ये जर दोन महिलांसाठीचे आरक्षण पडले तर एका विद्यमान नगरसेवकाचा पत्ता कापला जाणार आहे. अन्यथा त्याला बाजूच्या वॉर्डात सरकावे लागणार आहे. त्यामुळे आपल्या प्रभागात महिलेचे एकच आरक्षण पडावे, यासाठी अनेकांनी आतापासूनच देव पाण्यात ठेवले आहेत.

येत्या एक ते दोन महिन्यात ठाणे महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका पार पडण्याची शक्यता आहे. त्या अनुषंगाने एक फेब्रुवारी रोजी प्रभाग रचना जाहीर करण्यात आली आहे. त्यावर हरकती, सूचना नोंदविण्यासाठी १४ फेब्रुवारी पर्यंतचा कालावधी देण्यात आला आहे. त्यानंतर पुढील महिन्यात आरक्षण सोडत निघणार आहे. महापालिकेत सत्तेस सहभागी होण्यासाठी ५० टक्के वाटा हा महिलांचा देखील आहे. मागील निवडणुकीचा विचार केल्यास चार सदस्यांचा एक प्रभाग असल्याने दोन पुरुष आणि दोन महिला असे आरक्षण पडले होते. त्यामुळे अनेकांना संधी उपलब्ध झाली होती.

दरम्यान आता पालिकेवर १४२ नगरसेवक निवडून जाणार आहेत. परंतु यंदा तीन सदस्यीय पध्दत असल्याने तिकीट कोणाला मिळणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. त्यातही प्रभाग रचनेत अनेक वॉर्डांची मोडतोड करण्यात आली आहे. काही वॉर्ड अतिशय छोटे तर काही वॉर्ड भले मोठे करण्यात आले आहेत. त्यातही वॉर्ड फोडण्यात आल्याने अनेक ठिकाणी विद्यमान नगरसेवकांना फटका बसण्याची शक्यता आहे. अशातच आता आरक्षण कशा पध्दतीने पडणार, याची चिंता इच्छुकांना जाणवू लागली आहे. तीन सदस्यीय पध्दत असल्याने एका वॉर्डात दोन नगरसेवक असताना त्या ठिकाणी दोन महिलांचे आरक्षण पडल्यास एकाला माघार घ्यावी लागणार आहे किंवा त्याला आपल्या पत्नीला रिंगणात उतरावे लागणार आहे किंवा बाजुचा वॉर्ड त्या उमेदवाराला शोधावा लागणार आहे. त्यामुळे किमान आपल्या वॉर्डात एक महिलेचे आरक्षण पडो, अशी इच्छा अनेकांनी बोलावून दाखविली आहे. अनेकांनी तर त्यासाठी आतापासूनच देव पाण्यात ठेवले असल्याचे समजते.

> लोकसंख्येनुसार ए.सी.ची सर्वाधिक टक्केवारी असलेल्या १० प्रभागांमध्ये हे आरक्षण टाकले जाणार आहेत. अनुसुचित जमातींची लोकसंख्या ४२ हजार ६९८ इतकी असून त्यांच्यासाठी तीन प्रभाग राखीव असतील. त्यातले दोन महिलांसाठी ठेवले जाणार आहेत. तर २०११ च्या लोकसंख्येनुसार अनुसुचित जातीची (एससी) लोकसंख्या १ लाख २६ हजार होती. त्यांच्यासाठी १४२ पैकी १० जागा आरक्षित ठेवल्या जाणार आहेत. त्यापैकी पाच जागा या महिलांसाठी असतील. निवडणूक आयोगाने प्रत्येक प्रभागातील एससी मतदारांची संख्या जाहीर केली आहे. हरकती सूचनांची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सुधारित नकाशानुसार लोकसंख्या जाहीर होईल. त्यानंतर या आरक्षित प्रभागाची निश्चिती होणार आहे. परंतु, या संभाव्य प्रभागांची चर्चा सुरू झाली असून त्यावरून इच्छुकांकडून मोर्चेबांधणी सुरू झाली आहे.

निवडक

ऑनलाइन अतिथी सत्र

पनवेल : चार फेब्रुवारी जागतिक कर्करोग दिनाच्या औचित्याने महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थीनीमध्ये कर्करोग तथा विशेषत्वाने स्तनांचा कर्करोग यासारख्या गंभीर आजाराबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चांगु काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज न्यु पनवेलच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग तथा प्राणीशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार चार फेब्रुवारी रोजी सायंकाळी आभासी अतिथी सत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

गॅस गिझरचे वाटप

पनवेल : डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजनेंतर्गत वन्यजीव ठाणे, कर्नाळा पक्षी अभयारण्या अंतर्गत ग्रामपरिस्थितीकीय विकास समिती शिरढोण यांच्या वतीने शिरढोण ग्रामपंचायत हद्दीतील ७६ लाभार्थ्यांना ७५ टक्के अनुदानात गॅस गिझरचे वाटप करण्यात आले. शिरढोण ग्रामपंचायतीचे माजी सरपंच तथा ग्रामपरिस्थितीकीय विकास समिती शिरढोण अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्या निवासस्थानी शुक्रवारी हा कार्यक्रम झाला.

वनवासींना मारहाण

कर्जत : तालुक्यातील ताडवाडी येथील जमिनी (सर्वे नंबर33/2) मध्ये शुक्रवारी खोदकाम सुरू होते. त्याचा जाब विचारण्यासाठी गेलेल्या दोन आदिवासी महिलांना तेथील तरूणांनी जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण केली. या प्रकरणी नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान

पनवेल : रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये इयत्ता बारावी आर्ट्स व कॉमर्सच्या विद्यार्थ्यांना बाह्य तज्ज्ञ मार्गदर्शकांच्या विशेष विषयनिहाय मार्गदर्शनपर व्याख्यानांची मालिका नुकतीच सुरू झाली. विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी व समन्वय समितीचे सदस्य अरुणशेठ भगत यांच्या संकल्पनेतून विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत.

स्वच्छतेची जनजागृती

पनवेल : 'स्वच्छ सर्वेक्षण २०२२' मध्ये पनवेल महापालिकेच्यावतीने घनकचरा व्यवस्थापन विषयक विविध उपक्रम राबविले जात आहेत. या अनुषंगाने नागरिकांना त्यांच्या विविध सभा, समारंभ श्री आर संकल्पनेनुसार साजरे करण्याचे आवाहन पनवेल महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे आहे.

साई शाळेवर कब्जा करणाऱ्या दाम्पत्याला अटक

शाळेसाठी शिक्षकांचे आमरण उपोषण सुरू

कल्याण : कल्याण पूर्वेतील वादग्रस्त साई इंग्लिश स्कूलवर जबरदस्तीने कब्जा करणाऱ्या पती-पत्नी गिरी बाबू आणि स्वर्णलक्ष्मी गिरी बाबू या दोघांना कोळसेवाडी पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्या अटकेनंतर साई शाळेचे प्रकरण तापले असून शाळेचा ताबा मिळविण्यासाठी आणि गिरी दाम्पत्याला जास्तीत जास्त शिक्षा व्हावी यासाठी शाळेतील शिक्षिकांनी आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे.

शाळेचे अध्यक्ष रामचंद्रमूर्ती यांच्या निधनानंतर शाळेच्या मालमत्तेवरून वाद सुरू झाला होता. दिवंगत रामचंद्रमूर्ती यांच्या पत्नी मैथिली मूर्ती यांनी आरोप केला आहे की, लॉकडाऊनमुळे शाळा बंद असताना गिरी बाबू नावाच्या व्यक्तीने याचाच फायदा घेऊन शाळेचा ताबा घेतला आणि शाळेची आवश्यक कागदपत्रेही बळकावली. स्वतःला शाळेचे विश्वस्त म्हणून घोषित करून गिरी बाबू विद्यार्थ्यांकडून फीही वसूल करत होता. याप्रकरणी कोळसेवाडी पोलिसांनी मैथिली मूर्ती यांच्या तक्रारीवरून काही महिन्यांपूर्वी गिरी बाबू आणि त्यांच्या पत्नीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

दरम्यान गुन्हा दाखल होताच आरोपी फरार झाला होता, मात्र बऱ्याच प्रतीक्षेनंतर अखेर आरोपी पोलिसांच्या हाती लागला. कोळसेवाडी पोलीस स्टेशनचे व.पो.नि. बशीर शेख व त्यांच्या पथकाने साई इंग्लिश स्कूलवर जबरदस्तीने कब्जा केल्याप्रकरणी गिरी बाबू व त्यांच्या पत्नीला अटक करून न्यायालयात हजर केले. त्याचवेळी शाळेच्या शिक्षिका मैथिली मूर्ती आणि त्यांची मुलगी श्रीलक्ष्मी मूर्ती यांनी शाळेच्या बाहेर बसून आरोपींवर कडक कारवाई करण्यात यावी यासाठी आमरण उपोषण चालू केले असून त्याचा दुसरा दिवस आहे.

या आमरण उपोषणाला शाळेतील पालकांचाही मोठा प्रतिसाद मिळत आहे.

सिडको युनियनवर पुन्हा एकदा प्रगती पॅनेलचे वर्चस्व

नवी मुंबई : सिडकोच्या ५० वर्षाच्या कार्यकाळात प्रथमच कर्मचारी युनियनच्या कार्यकारिणी सदस्यांची निवड बिनविरोध करून सिडको कर्मचाऱ्यांनी आपल्यातील एकजुटीचे दर्शन घडवले आहे. युनियनच्या अध्यक्ष पदासाठी प्रगती पॅनलचे विनोद पाटील यांची बिनविरोध निवड झाल्याची घोषणा निवडणुक अधिकाऱ्यांनी केली आहे.

मुदत संपलेल्या सिडको एम्प्लॉईज युनियनच्या नवीन कार्यकारणीच्या निवडीकरिता येत्या १० फेब्रुवारी रोजी होणारी निवडणूक संपन्न होण्यापूर्वीच एकता पॅनेलच्या उमेदवारांनी दाखल केलेले अवघे चार उमेदवारी अर्ज मागे घेतल्यामुळे प्रगती पॅनेलचे उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. त्यामुळे गत १५ वर्षांपासून सिडको एम्प्लॉईज युनियनवर फडकत असलेला प्रगती पॅनेलचा झेंडा पुन्हा एकदा डौलाने फडकू लागला आहे. माजी अध्यक्ष निलेश तांडेल हे सेवानिवृत्त झाल्यामुळे रिक्त झालेल्या युनियनच्या अध्यक्षपदाची हंगामी जबाबदारी युनियनचे उपाध्यक्ष विनोद पाटील सांभाळत होते.

ठाण्यात १९ नवीन मोबाईल टॉवर

वार्ताहर/ठाणे

ठाणे महापालिका हद्दीत ७५२ मोबाईल टॉवरची नोंदणी असली तरी प्रत्यक्षात मात्र ही संख्या जास्त असण्याची शक्यता असल्याने ठाणे महापालिकेने मोबाईल टॉवरची नोंदणी करण्याचे आवाहन संबंधित कंपन्यांना केले होते. पालिकेच्या या आवाहनानंतर १९ नवीन मोबाईल टॉवरची नोंदणी पालिकेकडे झाली असून यामधून पालिकेच्या उत्पन्नात ३० लाखांची भर पडणार आहे.

दरम्यान केवळ आवाहन न करता मोबाईल टॉवर शोधण्याची मोहीम देखील हाती घेण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाच्या वतीने देण्यात आली आहे.

ठाणे महापालिका हद्दीत विविध कंपन्यांना मोबाईल टॉवर उभारण्याची परवानगी देण्यात आली असली तरी, दोन कंपन्यांची कोर्टात केस सुरू असल्याने ठाणे महापालिकेला यामुळे सुमारे ४० कोटींचा फटका बसला आहे. या दोन्ही कंपन्यांची केस कोर्टात असल्याने संबंधित कंपन्यांकडून ठाणे महापालिकेला टॅक्स वसूल करता आलेला नाही. दुसरीकडे ठाणे महापालिका हद्दीत केवळ ७५२ मोबाईल टॉवरची नोंदणी मालमत्ता विभागाकडे झाली असून प्रत्यक्षात मात्र ही संख्या हजारांच्या घरात आहे. अशातच अनाधिकृत मोबाईल टॉवर नेमके किती आहे, याची माहिती ठाणे महापालिकेकडे सुद्धा नसल्याचे यापूर्वी झालेल्या पालिकेच्या सर्वसाधारण सभेत उघड झाले होते. त्यामुळे शहरात नेमके किती मोबाईल टॉवर कार्यरत आहेत याची माहिती घेण्याचे काम प्रशासनाच्या वतीने करण्यात आले. कर विभागाने दिलेल्या माहिती नुसार शहरात ७५२ मोबाईल टॉवरचा रेकॉर्ड पालिकेकडे उपलब्ध असला तरी यातील काही टॉवर बंद असल्याने त्यांच्याकडून टॅक्स मिळत नाही.

बोगस चेक प्रकरणी आणखी एकास अटक

आरोपींची संख्या पोहोचली आठवर

वार्ताहर/डोंबिवली

डोंबिवलीतील बनावट चेकप्रकरणी पोलिसांनी आज मुख्य सूत्रधारासह पाच जणांच्या मुसक्या आवळल्या आहेत. या टोळीने आतापर्यंत १० कोटींचा गंडा घातला आहे.

याआधी एक ऑक्टोबर २०२१ रोजी डोंबिवली पूर्व भागातील एचडीएफसी बँकेच्या शाखेत तीन जण एक बनावट चेक घेऊन गेले होते. यातील एकाने आपण सेवाभावी संस्थेचा अध्यक्ष असून आपल्या संस्थेला इंडोस टॉवर लिमिटेड या मोबाईल टॉवर कंपनीकडून २४ कोटी रुपये देणगी मिळाली आहे असे सांगितले. यानंतर बँकेतील क्लर्कने बँक मॅनेजरला या चेकची माहिती दिली. मॅनेजरने सीसीटीव्हीमध्ये पाहिले असता या तिघांच्या संशयास्पद वाटल्या. मॅनेजरने डोंबिवली मानपाडा पोलिसांना याबाबत माहिती दिली. यानंतर मानपाडा पोलिसांनी तात्काळ बँकेत हजर होत या तिघांना ताब्यात घेतले. त्यांची चौकशी केली असता ही फसवणुकीची घटना समोर आली.

बनावट चेक तयार करुन आतापर्यंत देशभरात १० कोटीचा गंडा घालणाऱ्या या टोळीचा पर्दाफाश करीत त्यांच्या म्होरक्याला डोंबिवलीच्या मानपाडा पोलिसांनी गुजरातहून बेड्या ठोकल्या आहेत. या टोळीमध्ये अजून किती लोक आहेत याचा पोलीस तपास करीत आहेत. आतापर्यंत एकूण आठ लोकांना अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे. बँकेत आलेल्या तिघांपैकी एक जण हरिचंद्र कडवे याने आपण वांगणीतील संत रोहिदास सेवा संस्थेचा अध्यक्ष असल्याची बतावणी केली होती. मात्र मॅनेजरला संशय आल्याने हा प्रकार उघडकीस आला होता. त्यानंतर पोलिसांनी अन्य पाच जणांना अटक केली.

अटक केलेल्या आठ जणांना समोरासमोर बसवून पोलिसांनी चौकशी केली असता बनावट चेक कसा मिळवला याची माहिती पोलिसांनी मिळाली. आरोपींनी दिलेल्या माहितीनुसार सचिन साळसकर नामक कॉम्प्युटर मॅकेनिक आहे. या टोळीचा म्होरक्या भावेश ढोलकिया याच्या सांगण्यावरुन साळसकर कोणत्याही बँकेचा बनावट चेक तयार करीत होता. असाच 24 कोटीचा चेक त्याने इंडोस कंपनीच्या चेक व्यवहार बघणाऱ्या व्यक्तीच्या स्वाक्षरीचा बनवला होता. टोळीचा म्होरक्या भावेश ढोलकिया हा याआधीही अशाच एका प्रकरणात जेलमध्ये होता. या टोळीने तामिळनाडू, गुजरात कर्नाटक महाराष्ट्र यासह अन्य राज्यातही अशी फसवणूक केल्याचे समोर आले आहे.

TATA

TATA STEEL LIMITED

Registered Offce: Bombay House, 24, Homi Mody Street, Fort, Mumbai - 400 001 India
Tel.: 91 22 6665 8282 • Fax No.: 91 22 6665 7724 • Email: cosec@tatasteel.com • Website: www.tatasteel.com
CIN: L27100MH1907PLC000260

सूचना

३१ डिसेंबर, २०२१ रोजी संपलेल्या तिमाही/नऊ महिन्यांसाठी अलिप्त वित्तीय निष्कर्षांचा उतारा

₹ कोटी

तपशील	३१.१२.२०२१ रोजी संपलेली तिमाही	३०.०९.२०२१ रोजी संपलेली तिमाही	३१.१२.२०२० रोजी संपलेली तिमाही	३१.१२.२०२१ रोजी संपलेले नऊ महीने	३१.१२.२०२० रोजी संपलेले नऊ महीने	३१.०३.२०२१ रोजी संपलेले आर्थिक वर्ष
	लेखापरिक्षित	लेखापरिक्षित	लेखापरिक्षित	लेखापरिक्षित	लेखापरिक्षित	लेखापरिक्षित
प्रवर्तनातून एकूण महसूल	३१,९६४.२५	३२,६८६.६२	२३,१९०.३१	९२,३४०.४२	५६,७७७.४९	८४,१३२.९२
कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर आणि अपवादात्मक बाबींपूर्वी)	१०,४४३.६६	११,७३०.४०	६,०१२.२७	३३,६११.०६	८,२७९.५८	१७,८६८.५४
कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर)	१०,२६२.६९	११,५९९.६९	५,७८६.३३	३३,४५२.०६	८,०७१.६२	१८,६०९.८४
कालावधीसाठी करोत्तर निव्वळ नफा/(तोटा)	७,६८३.३९	८,७०८.२६	४,२८५.३६	२५,१७१.७२	८,९४८.३२	१७,०७७.९७
कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीसाठी नफा/(तोटा) (करोत्तर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून)	७,८३६.९९	८,८७१.२६	४,३०२.३०	२५,५१८.९३	८,९९५.८५	१७,४८९.३८
भरणा झालेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य ₹ १० प्रति भाग)	१,२२२.३३	१,२०३.४६	१,१४६.१३	१,२२२.३३	१,१४६.१३	१,१९८.७८
पुनर्मुल्यांकित राखीव वगळून राखीव						९३,२११.३४
सिक्युरिटीज प्रिमियम रिझर्व्ह				३१,२८६.४८	२७,७८०.२८	३०,९६४.७६
नेट वर्थ	११७,२४४.१७	१०९,३७९.७१	८४,९८२.००	११७,२४४.१७	८४,९८२.००	९५,१८५.१२
भरणा झालेले कर्ज भांडवल				१३,६४८.१७	१७,३८७.२६	१३,५६७.६०
निव्वळ डेब्ट इक्विटी रेशो	०.२७	०.३२	०.३९	०.२७	०.३९	०.३२
प्रत्येकी ₹ १० ची मूलभूत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबीनंतर)	६२.८८	७१.३०	३६.३८	२०६.१९	७५.५८	१४५.००
प्रत्येकी ₹ १० ची सौम्यिकृत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर)	६२.८५	७१.२५	३६.३८	२०६.००	७५.५७	१४४.९९
डिबेंचर विमोचन राखीव	२,०४६.००	२,०४६.००	२,०४६.००	२,०४६.००	२,०४६.००	२,०४६.००
डेब्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो	१६.०६	१८.१९	४.८७	१६.००	२.७२	३.६०
इंटरेस्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो	२३.१६	२२.२९	७.३९	२१.४५	३.७५	५.८१

३१ डिसेंबर, २०२१ रोजी संपलेल्या तिमाही/नऊ महिन्यांसाठी एकत्रित वित्तीय निष्कर्षांचा उतारा

₹ कोटी

तपशील	३१.१२.२०२१ रोजी संपलेली तिमाही	३०.०९.२०२१ रोजी संपलेली तिमाही	३१.१२.२०२० रोजी संपलेली तिमाही	३१.१२.२०२१ रोजी संपलेले नऊ महीने	३१.१२.२०२० रोजी संपलेले नऊ महीने	३१.०३.२०२१ रोजी संपलेले आर्थिक वर्ष
	अलेखापरिक्षित	अलेखापरिक्षित	अलेखापरिक्षित	अलेखापरिक्षित	अलेखापरिक्षित	लेखापरिक्षित
प्रवर्तनातून एकूण महसूल	६०,७८३.११	६०,३८७.१३	४१,९३५.२१	१७४,६३५.६७	१०६,४४९.०३	१५६,४७७.४०
कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर आणि अपवादात्मक बाबींपूर्वी)	१२,३५८.९८	१३,६०३.६१	५,७४६.७४	३८,२२१.६७	४,५३८.८६	१४,८८६.८५
कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर)	१२,१६५.५८	१४,११९.५७	५,५९३.१९	३८,३६१.९०	४,४८६.८३	१३,८४३.६९
कालावधीसाठी करोत्तर निव्वळ नफा/(तोटा)	९,५९८.१६	१२,५४७.७०	४,०१०.९४	३१,९१४.२०	१,०२७.८८	८,१८९.७९
कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीसाठी नफा/ (तोटा) (करोत्तर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून)	१०,४८५.४६	११,८३२.६८	२,२०४.२०	३२,७०१.००	(५,१५२.२५)	९७८.७८
भरणा झालेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य ₹ १० प्रति भाग)	१,२२१.१७	१,२०२.२८	१,१४४.९५	१,२२१.१७	१,१४४.९५	१,१९७.६१
राखीव (पुनर्मुल्यांकित राखीव वगळून) आणि अनियंत्रक व्याज						७५,५३५.८४
नेटवर्थ	१०४,१८२.७१	९१,५१८.४६	६६,८९१.५७	१०४,१८२.७१	६६,८९१.५७	७४,२३८.७७
निव्वळ डेब्ट इक्विटी रेशो	०.६८	०.७९	१.१८	०.६८	१.१८	०.९८
प्रति समभाग प्राप्ती						
प्रत्येकी ₹ १० ची मूलभूत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर)	७९.१०	९९.१६	३१.८६	२५२.४८	६.०८	६३.७८
प्रत्येकी ₹ १० ची सौम्यिकृत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत अपवादात्मक बाबींनंतर)	७९.०६	९९.०८	३१.८६	२५२.२४	६.०८	६३.७८
डिबेंचर विमोचन राखीव	२,०४६.००	२,०४६.००	२,०४६.००	२,०४६.००	२,०४६.००	२,०४६.००
डेब्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो	९.३७	११.४१	३.५९	९.०२	१.३८	२.२३
इंटरेस्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो	१२.५७	१४.९०	४.८४	११.८३	१.९५	३.३९

टीप :
सेबी (लिस्टिंग अँड अदर डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ आणि रेग्युलेशन ५२ अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजेसमध्ये सादर केलेल्या ३१ डिसेंबर, २०२१ रोजी संपलेल्या तिमाही/नऊ महिन्यांसाठी अलिप्त आणि एकत्रित वित्तीय निष्कर्षांच्या तपशीलवार विवरणाचा वरील एक उतारा आहे. ३१ डिसेंबर, २०२१ रोजी संपलेल्या तिमाही/नऊ महिन्यांसाठी अलिप्त आणि एकत्रित निष्कर्षांचे संपूर्ण विवरण स्टॉक एक्स्चेंजेसच्या वेबसाईटस् (www.nseindia.com/www.bseindia.com) आणि कंपनीची वेबसाईट (www.tatasteel.com) वर उपलब्ध आहे.

टी. व्ही. नरेंद्रन
मुख्य कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालक

कौशिक चॅटर्जी
कार्यकारी संचालक आणि मुख्य वित्तीय अधिकारी

मुंबई : ०४ फेब्रुवारी, २०२२

TATA STEEL

आरोग्य सेवकांच्या वेतनाची समस्या

मुरुडमध्ये रुग्णवाहिका चालकांचा पगार रखडला

वार्ताहर/मुरुड जंजिरा

मुरुड ग्रामीण रुगणालयातील १०२ नंबर ॲम्ब्युलन्स गाडीवर काम करणाऱ्या चालकांचे मागील तीन महिन्यापासून वेतन रखडले असून आरोग्य खात्याचे दुर्लक्ष्य झाल्याने या चालकांवर उपासमारीची पाळी आली आहे. वेळोवेळी या चालकांनी वरिष्ठांना कालवून सुद्धा वेतन मिळत नसल्याने हे सर्व चालक हवालदिल झाले आहेत.

ॲम्ब्युलन्सवर चालक असणाऱ्या पनवेल, अलिबाग, रोहा, उरण, कर्जत चौक, महाड, रोहा आदी तालुक्यातील चालकांना मागील तीन महिन्याचा पगार मिळालेला नाही. त्यामुळे कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करावयाचा, हा प्रश्न येथे निर्माण झाला आहे.

ग्रामीण रुग्णालयातील १०२ ॲम्ब्युलन्स गाडीचा उपयोग आरटीपीसीआर सॅम्पल जिल्हा रुग्णालयात घेऊन जाणे, व्हॅक्सिन आणणे, औषधे आणणे, ऑक्सिजन आणणे, व्हॅक्सिनेशन सेंटरवर व्हॅक्सिनची ने-आण करणे, अतितातडीच्या रुग्णास तातडीने जिल्हा रुग्णालय व अन्य हॉस्पिटल मध्ये पोहचवणे, आदी स्वरूपाची कामे येथील चालक २४ तास गरज लागेल तेव्हा करीत असतात.

ॲशकॉम या कंपनीकडून येथील चालकांना पगार दिला जातोय. परंतु वारंवार तीन-चार महिन्यांच्या विलंबानंतर सातत्याने फोन केल्यावर एक किंवा दोन महिन्याचा पगार दिला जातो, तोही कधी पूर्ण तर कधी अर्धा पगार या चालकांना मिळत असतो.

या चालकांना मासीक वेतन ८,९८३ रुपये दिले जाते. परंतु हा पगार सुद्धा कित्येक महिन्यांच्या अंतराने दिला जात आहे. केंद्र शासनाने किमान वेतन हे १८ हजार रुपये केले असताना सुद्धा संबंधित ठेकेदार मात्र या चालकांना कमी पगार देऊन त्यांची पिळवणूक करीत असताना सुद्धा वरिष्ठ अधिकारी मात्र मूग गिळून गप्प असल्याने संताप व्यक्त होत आहे.

कर्जतमध्ये दोन कर्मचारी पाच महिने पगाराविना

कर्जत : कर्जत शहरातील उपजिल्हा रुग्णालयात कोविड लसीकरणची सेवा अखंडित सुरू ठेवणाऱ्या दोन आरोग्य कर्मचारी सप्टेंबर २०२१ पासून पगाराविना सेवा बजावत आहेत. कर्जत नगरपरिषदेच्या या कंत्राटी महिला कर्मचारी कोविड लसीकरण करण्याचे काम करीत असून त्यांना वेतन मिळत नसल्याने कर्जत लसीकरण संघर्ष समितीने नाराजी व्यक्त केली आहे.

दोन वर्षे कोविडमुळे सर्वांची लसीकरण करून घेण्यासाठी धावपळ सुरू असते. अशावेळी मार्च २०२१ पासून कर्जत नगरपालिका प्रशासनाने आपल्या आरोग्य सेवेतील दोन महिला कर्मचारी यांना उपजिल्हा रुग्णालयात सेवेत पाठवले आहे. कर्जत नगरपरिषदेच्या या दोन कंत्राटी कामगार तरुणी मागील सहा महिन्यांपासुन पगाराविना आपले कर्तव्य पार पाडत आहेत. याचे कर्जत नगरपरिषद प्रशासनास त्याचे काहीच सोयरसुतक नाही. नगरपरिषदेच्या हलगर्जीपणामुळे सदर तरुणींना सप्टेंबर २०२१ पासुन कुठल्याही प्रकारचे वेतन दिले गेलेले नाही. तरी देखील या दोन्ही कंत्राटी कर्मचारी न चुकता सेवा बजावत आहेत. प्रशासनाच्या या दुर्लक्षामुळे संताप व्यक्त होत आहे.

मध्य रेल्वे

कॅलिब्रेशन आणि चाचणी कामे

कामाचे नाव: मध्य रेल्वेच्या मुंबई विभागाच्या कल्याण आणि लोणावाला जिल्ह्याच्या आसनगाव, कसारा, कर्जत आणि खंडाळा येथील ४ नग एलएसई आणि ठाकुर्ली पॉवर हाऊस मधील एबीबी निर्मिती आरईएल ६७० संरक्षित रेलेज् च्या कॅलिब्रेशन आणि चाचणी. **अंदाजित मूल्य:** रु. ७०,८०,००.००, **इअर:** रु. १४,२००.००, **निविदा प्रपत्राचे किंमत:** ०.००, **पूर्ण करण्याचे कालावधी:** ४ महिने, **निविदा सादर करण्याचे तारीख आणि वेळ: २३.०२.२०२२ रोजीस दु. ११.०० वा. पर्यंत.** ई-निविदेचे संपूर्ण विवरण अधिकृत रेल्वे वेबसाईट http://www.ireps.gov.in येथे उपलब्ध. वेबसाईट वरुन संपूर्ण दस्तावेज डाऊनलोड करता येतील. निविदेच्या तपशील वरिष्ठ डीईई (टीडी) केव्हायएन च्या कल्याण च्या ''सूचना फलक'' वर उपलब्ध आहे. **खुला ई-निविदा सूचना क्र. - के वायएन.एल.डी.५८३.पी.आरईव्ही. २०२१-२२/०२. कॉन्ट. आर१**

रेल्वे हेल्पलाईन 139 VAPL/741

मध्य रेल्वे

इलेक्ट्रीकल पूरक घटकांचा रिवायरिंग आणि बदल करणे

भारताचा राष्ट्रपती करिता आणि च्या वतीने नामांकित कंत्राटदार कडून वेबसाईट www.ireps.gov.in मार्फत खुला ई-निविदा मागवित आहे. **कामाचे नाव:** ३ रा मजला, एनएबी इमारत, सीएसएमटी येथे पीएफए च्या कार्यालयाच्या इलेक्ट्रीकल पूरक घटकांचा रिवायरिंग आणि बदल करणे. **निविदा सूचना क्र. ३२/२०२१ (बी. बी. एल. जी. डब्ल्यू सीएसएमटी.२०२१.१९) कामाचे अंदाजित खर्च:** रु. २७,३३,८९५/-, **ईडीएम:** रु. ५४,७००/-, **वैधता:** ४५ दिवस, **देखभाल कालावधी समाप्ती:** ०३ महिने (सी), **सूचना:** १. निविदा समाप्ती तारिख आणि उपरोक्त निविदेची वेळ: **२४.०२.२०२२ रोजीस दु. १.०० वा.** पर्यंत आणि **दु. १.०० वा.** नंतर उघडण्यात येईल. २. संभाव्य निविदाकार फक्त वेबसाईट www.ireps.gov.in मार्फत ला भेट देण्याची विनंती आहे. ३. निविदाकार फक्त वेबसाईट www.ireps.gov.in मार्फत इलेक्ट्रॉनिकली वरील ई-निविदा मध्ये भाग घेऊ शकता. जर हाताने सादर केल्यास ते उघडण्यात येणार नाही किंवा स्विकारले जाणार नाही. ४. पुढील चौकशी करिता येथे संपर्कः वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता, (सर्वसामान्य सेवा), ॲनेक्स इमारत, १ ला मजला, मध्य रेल्वे, मुंबई सीएसएमटी. ५. सदर निविदा दिनांक १५.०६.२०१७ च्या पब्लिक प्रोक्युरमेंट पोलिसी ऑडर च्या अनुपालनात आहे.

रेल्वे हेल्पलाईन 139 VAPL/745

कळवा स्थानक ते ठाणे स्थानकापर्यंत प्रवाशांची पायपीट

मेगा ब्लॉकमुळे प्रवाशांचे हाल

लोकसत्ता प्रतिनिधी

(छाया : दीपक जोशी)

ठाणे : पाचव्या आणि सहाव्या मार्गिकेसाठी शनिवारी घेण्यात आलेल्या मेगाब्लॉकमुळे ठाणे आणि त्यापल्ल्याच्या शहरातील रेल्वे प्रवाशांचे हाल झाले. उपनगरीय रेल्वेच्या काही फेऱ्याही रद्द करण्यात आल्या होत्या. त्यामुळे ठाणे, कळवा, मुंब्रा, दिवा आणि डोंबिवली रेल्वे स्थानकात प्रवाशांची गर्दी झाली होती. तसेच उपनगरीय रेल्वेची वाहतूकही सुमारे २० ते २५ मिनिटे उशिराने सुरू असल्यामुळे कार्यालयात पोहचण्यासाठी उशीर झाला. कळवा स्थानकात रेल्वेगाडीत प्रवेश करता येत नसल्याने काही प्रवाशांनी पायपीट करत ठाणे स्थानक गाठल्याचे चित्र दिसून आले.

ठाणे ते दिवा या स्थानकादरम्यान रेल्वेच्या पाचव्या आणि सहाव्या मार्गिकेच्या निर्माणाचे काम मध्य रेल्वे प्रशासन आणि मुंबई रेल्वे विकास महामंडळाकडून सुरू आहे. शनिवारी घेण्यात आलेल्या मेगाब्लॉकमुळे जलद उपनगरीय रेल्वे गाड्यांची वाहतूक दिवा ते ठाणे स्थानकादरम्यान धिम्या मार्गिकेवरून सोडण्यात येत होती. काही रेल्वेगाड्यांच्या फेऱ्याही रद्द करण्यात आल्या होत्या. याचा फटका शनिवार सकाळी कामावर निघालेल्या प्रवाशांना बसला. ठाणे, कळवा, मुंब्रा, दिवा आणि डोंबिवली रेल्वे स्थानकात प्रवाशांची प्रचंड झाली होती.

कळवा, मुंब्रा आणि दिवा रेल्वे स्थानकातही प्रवाशांची गर्दी झाली होती. कळवा स्थानकात रेल्वेगाडीत चढता येत नसल्याने काही प्रवाशांनी पायपीट करत ठाणे स्थानक गाठल्याचे चित्र दिसून आले. तर मुंब्रा आणि दिवा येथील प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी ठाणे महापालिका परिवहन उपक्रमाने प्रत्येक १० ते १५ मिनीटांनी बसफेऱ्यांचे नियोजन केले होते. परंतु या बसगाड्यांतून प्रवास करताना अधिकचा वेळ जात असल्याने प्रवाशांचा या बसगाड्यांना फारसा प्रतिसाद मिळत नव्हता. डोंबिवली रेल्वे स्थानकातही प्रवाशांची गर्दी असल्याचे चित्र होते.

आजपासून जलद मार्ग कार्यान्वित

यापूर्वी उपनगरीय जलद रेल्वेगाड्या पारसिक बोगद्यातून वाहतूक करत होत्या. जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात घेण्यात आलेल्या मेगाब्लॉकनंतर कल्याणहून ठाण्याच्या दिशेने येणाऱ्या जलद उपनगरीय गाड्यांची वाहतूक कळवा आणि मुंब्रा रेल्वे स्थानकाच्या मार्गे सुरू होती. परंतु ठाण्याहून कल्याणच्या दिशेने जाणाऱ्या जलद उपनगरीय गाड्यांची वाहतूक ही पारसिक बोगद्यातूनच सुरू होती. पारसिक बोगद्यातून लांबपल्ल्याच्या गाड्या धावत असल्याने कल्याणच्या दिशेने जाणाऱ्या गाड्यांची रखडपट्टी होत होती. अखेर शनिवारी २८ तासांचा मेगाब्लॉक घेण्यात आला. त्यामुळे रविवार सकाळपासून कल्याणच्या दिशेने जाणाऱ्या रेल्वेगाड्याही आता पारसिक बोगद्याऐवजी कळवा, मुंब्रा स्थानकांमधून वाहतूक करणार आहेत.

‘जिओ’ मोबाइल सेवा ठप्प

मुंबई : मुंबई, नवी मुंबई आणि ठाणे परिसरात शनिवारी दुपारपासून रिलायन्सच्या ‘जिओ’ मोबाईल सेवेचे नेटवर्क ठप्प झाले होते. त्यामुळे दूरध्वनी आणि इंटरनेट सेवा वापरणाऱ्या ग्राहकांची मोठी गैरसोय झाली. अनेक ग्राहकांनी समाज माध्यमांवर तक्रारींद्वारे आपला रोष व्यक्त केला.

जिओचे नेटवर्क शनिवारी दुपारी सव्वाबारा वाजल्यापासून बंद झाले होते. तांत्रिक अडचणींमुळे सेवा ठप्प झाल्याचे सांगण्यात येत होते. जिओचे नेटवर्क ठप्प असल्याने दूरध्वनी आणि इंटरनेट सेवा बंद झाली. याचा जिओच्या ग्राहकांना मोठा फटका बसला.

फक्त मुंबई, नवी मुंबई, आणि ठाणे या परिसरामधील ग्राहकांनाच या अडचणी येत होत्या. देशात अन्यत्र मात्र नेटवर्क सुरळीत सुरू होते. दुपारी काही काळ नेटवर्क सुरू झाले होते, पण अधूनमधून ते बंद होत होते. त्यामुळे ग्राहकांना अडचणींचा सामना करावा लागत होता.

त्रासाबद्दल दोन दिवस मोफत इंटरनेट सेवा

सकाळी ११ ते रात्री ९ वाजेपर्यंत ग्राहकांना जिओ सेवेत व्यत्यय येत होता. त्यानंतर सर्व सेवा सुरळीत सुरू झाल्या. ग्राहकांना झालेल्या या त्रासाबद्दल दोन दिवसांची अमर्याद ‘इंटरनेट सेवा’ विनामूल्य देण्यात आली आहे. महाराष्ट्रातील ग्राहकांना यापूर्वी कधीच अशा तांत्रिक अडचणी आल्या नव्हत्या, असे ‘जिओ’तर्फे सांगण्यात आले.

‘एमएसआरडीसी’च्या उड्डाणपुलावरील १०० मोबाइल टॉवर बंद

लाखो मुंबईकरांना नेटवर्कसंबंधी अडचणी

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (एमएसआरडीसी) उड्डाणपुलावरील १०० मोबाइल टॉवर ३१ डिसेंबरपासून बंद असल्याने मुंबईतील कोट्यवधी ग्राहकांना नेटवर्क संबंधी अडणींना सामोरे जावे लागत आहे.

नेटवर्क सेवा पुरवणाऱ्या कंपन्यांबरोबरचा करार ‘एमएसआरडीसी’ने रद्द केल्यामुळे मुंबईकरांना प्रवासादरम्यान मोबाइल नेटवर्कमध्ये अडचणी येत असल्याचा आरोप सेल्युलर ऑपरेटर्स ऑफ इंडियाने (सीओआय) केला आहे. ‘सीओआय’च्या म्हणण्यानुसार या संदर्भातील करार ३१ डिसेंबरला संपुष्टात आला आहे. मोबाइल नेटवर्कच्या पायाभूत सुविधा पुरविणाऱ्या एका कंपनीने भाडे थकविल्याने ‘एमएसआरडीसी’ने पायाभूत सुविधा पुरविण्यासंबंधीच्या करारास मुदतवाढ न देता तो रद्द केला. दरम्यान, तात्पुरती नव्या कंपनीची नियुक्ती करण्यात आली असून लवकरच बंद टॉवरची सेवा सुरू होईल, असे स्पष्टीकरण ‘एमएसआरडीसी’ने दिले.

मुंबईकरांना चांगली नेटवर्क सेवा मिळावी यासाठी ‘एमएसआरडीसी’च्या अखत्यारीतील उड्डाणपूलावर मोबाइल टॉवर बसविण्यात आले आहेत. नेटवर्कसंबंधी पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी स्वतंत्र कंपन्या आहेत. त्यांच्याशी एमएसआरडीसीने करार केला होता. मात्र एमएसआरडीसीने ३१ डिसेंबर रोजी याबाबतचे सर्व करार रद्द केले आहेत. तर पुलावरील टॉवर काढून टाकून साहित्य जप्त करण्याचाही निर्णय घेतला आहे.

कराराची मुदत संपल्याने सुयोग टेलिमॅटीक्स कंपनीने ३० कोटींहून अधिक भाडे थकविले आहे. त्यामुळे करार रद्द करुन नवीन कंपनीची नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार ‘४६५ बीटीएस पोल’साठी निविदा काढण्यात आली आहे. निविदा प्रक्रिया सुरू असून सर्व यंत्रणा नव्याने बसविण्यात येणार असल्याची माहिती ‘एमएसआरडीसी’चे सहव्यवस्थापकीय संचालक संजय यादव यांनी दिली.

‘एमएसआरडीसी’च्या या निर्णयामुळे मुंबईकरांना प्रवासादरम्यान मोबाइल नेटवर्कमध्ये अडचणी येत असल्याचा आरोप ‘सीओआय’ने केला आहे. सध्या १०० टॉवर बंद असून लवकरच आणखी काही टॉवर बंद करण्यात येण्याची शक्यताही व्यक्त केली आहे. ‘एमएसआरडीसी’ने लवकरात लवकर टॉवर सुरू करावेत आणि यापुढे आणखी टॉवर बंद करू नये अशी लेखी विनंती सीओआयचे महासंचालक लेफ्टनंट जनरल डॉ. एस. पी. कोचर यांनी राज्य सरकार, तसेच एमएसआरडीसीकडे केली आहे. तसेच भेटीसाठी वेळही मागितली आहे. मात्र भेटीसाठी वेळ दिली जात नसल्याचे सीओआयचे म्हणणे आहे.

टॉवर बंद असले तरी नेटवर्कच्या तितक्याशा अडचणी येत नसल्याचे एमएसआरडीसीने स्पष्ट केले आहे. नवीन ४६५ टॉवर बसवून सेवा पूर्ववत करण्यासाठी निविदा काढण्यात आली आहे. ही प्रक्रिया पूर्ण होण्यास, तसेच प्रत्यक्ष सेवा सुरू करण्यासाठी काही वेळ लागणार आहे. त्यामुळे तात्पुरती तीन महिन्यांसाठी एका कंपनीची नियुक्ती केली असून त्यांना कार्यादेश देण्यात आले आहेत. लवकरच ही कंपनी काम सुरू करेल, असेही यादव यांनी सांगितले. येत्या तीन, चार महिन्यांत कायमस्वरूपी कंपनीची पाच वर्षांसाठी नियुक्ती करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. तात्पुरती स्वरुपात नियुक्त करण्यात आलेल्या कंपनीला पायाभूत सुविधा निर्माण करुन सेवा देण्यास बराच काळ लागणार आहे. त्यामुळे बंद टॉवर त्वरित सुरू करावे, अशी मागणी सीओआयने केली आहे.

ट्रकच्या धडकेत विद्यार्थीनीचा मृत्यू

कल्याण: ट्रकच्या धडकेत दुचाकीवरुन चाललेल्या मानसी म्हात्रे या विद्यार्थीनीचा जागीच मृत्यू झाला. नेवाळी-डावलपाडा भागातून जात असताना, समोरून येणाऱ्या ट्रकने दुचाकीला जोराची धडक दिली. या अपघातात या विद्यार्थीनीचे वडील आत्माराम म्हात्रे गंभीर जखमी झाले आहेत.

ती इयत्ता दहावीमध्ये शिक्षण घेत होती. वडिलांबरोबर दुचाकीवरून जाताना हा अपघात झाला. त्यात दोघेही खाली पडले. मानसीचा जागीच मृत्यू झाला. या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. ते चुकविताना वाहनचालकांना कसरत करावी लागते, असे या भागातील रहिवाशांनी सांगितले.

सोन्याची तस्करी करणाऱ्या पाच प्रवाशांना अटक

मुंबई : सीमा शुल्क विभागाने मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर दोन कारवायांमध्ये संयुक्त अरब अमिराती (यूएई) येथून मुंबईत सोन्याची तस्करी करणाऱ्या पाच प्रवाशांना अटक केली. त्यांच्याकडून दोन कोटी रुपये किमतीची सोन्याची पावडर जप्त करण्यात आली.

सीमाशुल्क विभागाच्या हवाई गुप्तचर कक्षाने (एआययू) ही कारवाई केली.

गुरुवारी चार संशयित प्रवाशांना विमानतळावर ताब्यात घेण्यात आले. त्यातील दोन प्रवासी शारजा, तर दोन अबुधाबी येथून आले होते. त्यांच्याकडून तीन किलो ६०० ग्रॅम सोने जप्त करण्यात आले. त्याची किंमत एक कोटी ५६ लाख रुपये असल्याचे अधिकाऱ्याने सांगितले. चारही आरोपींना अटक करण्यात आली आहे.

विमानतळावर एक संशयीत महिलेला संशयास्पदरित्या फिरत असल्याचे सीमाशुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आले. ती महिला दुबईवरुन मुंबईत आली होती. तिच्याकडून एकूण ८६८ ग्रॅम सोने जप्त करण्यात आले. त्याची किंमत ३८ लाख रुपये असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. सीमाशुल्क कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करून तिला अटक करण्यात आली.

भिवंडीत महिला पोलीस अधिकाऱ्याला धमकाविणाऱ्यास अटक

ठाणे : भिवंडीतील निजामपुरा पोलीस ठाण्यातील महिला पोलीस उपनिरीक्षक आश्लेषा घाटगे (२५) यांना एका व्यक्तीने पोलीस ठाण्यात येऊन धमकाविल्याचा प्रकार उघडकीस आला असून या प्रकरणी पोलिसांनी इमाम अन्सारी (३५) याला अटक केली आहे. महिलेची तक्रार नोंदवून घेत असल्याच्या वादातून त्याने हा प्रकार केल्याचे समोर आले आहे. पोलीस उपनिरीक्षक आश्लेषा घाटगे या निजामपुरा पोलीस ठाण्यात कार्यरत आहेत. त्या महिलेची तक्रार नोंदवून घेत होत्या. त्याच वेळी इमाम हा पोलीस ठाण्यात आला आणि त्याने त्यांना धमकावले.

RP-Sanjiv Goenka Group
Growing Legacies

firstsource

फर्स्टसोर्स सोल्यूशन्स लिमिटेड

३१ डिसेंबर २०२१ रोजी संपलेल्या तिमाही व नऊमाहीकरिता एकत्रिकृत लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांचा उतारा

(रु. मिलियनमध्ये, प्रति भाग डेटा व प्रति भाग समन्याय डेटा वगळता)

अ. क्र.	तपशील	संपलेली तिमाही			संपलेली नऊमाही		संपलेले वर्ष
		३१ डिसेंबर, २०२१	३० सप्टेंबर, २०२१	३१ डिसेंबर, २०२०	३१ डिसेंबर, २०२१	३१ डिसेंबर, २०२०	३१ मार्च, २०२१
		लेखापरीक्षित	लेखापरीक्षित	लेखापरीक्षित	लेखापरीक्षित	लेखापरीक्षित	लेखापरीक्षित
१	प्रवर्तनाकडील एकूण उत्पन्न	१४,६४०.३१	१४,२९३.४५	१३,६६४.९७	४३,७८१.६५	३६,१८३.४९	५०,७९२.४६
२	कालावधी/ वर्षाकरिता निव्वळ नफा/ (तोटा) (कर, अपवादात्मक आणि/ किंवा असाधारण आयटम्सपूर्वी)	१,६१३.५२	१,६४३.५५	१,४७५.७८	४,९१०.९९	३,७६४.८९	५,४६८.८९
३	करापूर्वी कालावधी/ वर्षाकरिता निव्वळ नफा/ (तोटा) (अपवादात्मक आणि/ किंवा असाधारण आयटम्सनंतर)	१,६१३.५२	१,६४३.५५	१,४७५.७८	४,९१०.९९	३,७६४.८९	४,३१८.३४
४	करानंतर कालावधी/ वर्षाकरिता निव्वळ नफा/ (तोटा) (अपवादात्मक आणि/ किंवा असाधारण आयटम्सनंतर)	१,३५४.५४	१,३५०.०७	१,२१०.४७	४,०४१.४२	३,१५०.०२	३,६१६.७७
५	कालावधी/ वर्षाकरिता एकूण व्यापक उत्पन्न	१,४३०.०१	१,५०९.७२	७६०.५८	४,५६२.१०	२,३२२.८३	२,७३८.०३
६	भरणा केलेले समन्याय भागभांडवल	६,९६९.९१	६,९६९.९१	६,९५५.६४	६,९६९.९१	६,९५५.५४	६,९६०.९९
७	राखीव (पुनर्मूल्यन राखीव वगळता) मागील वर्षाच्या लेखापरीक्षित ताळेबंदामध्ये दर्शविल्यानुसार						२१,०३१.८८
८	कमाई प्रति समन्याय भाग (प्रत्येकी रु. १०/-ची)						
	मूलभूत :	१.९९	२.०३	१.७८	५.९६	४.६१	५.३१
	सौम्य केलेले :	१.९२	१.९६	१.७२	५.७४	४.४८	५.१३

नोंदी :

१ स्वतंत्र वित्तीय निष्कर्षावरील (लेखापरीक्षित) अतिरिक्त माहिती खालीलप्रमाणे आहे :

(रु. मिलियनमध्ये)

तपशील	संपलेली तिमाही			संपलेली नऊमाही		संपलेले वर्ष
	३१ डिसेंबर, २०२१	३० सप्टेंबर, २०२१	३१ डिसेंबर, २०२०	३१ डिसेंबर, २०२१	३१ डिसेंबर, २०२०	३१ मार्च, २०२१
प्रवर्तनाकडील एकूण उत्पन्न	४,१०५.५२	४,१६१.८४	३,७५७.३५	१२,३५८.३१	९,३८६.७०	१३,५२९.५५
कराधानपूर्वी निव्वळ नफा	१,१३९.१३	१,२७१.०६	१,२६६.९४	३,६१४.०९	२,८७४.८०	४,२५३.२७
कराधाननंतर निव्वळ नफा	९५३.४८	१,१०२.६७	१,०७१.७०	३,०७०.८३	२,५१८.४७	३,६६६.५३

२ संचालक मंडळाच्या ०४ फेब्रुवारी, २०२२ रोजी घेण्यात आलेल्या सभेत रु. ३.५० प्रति समन्याय भागाच्या अंतरिम लाभांशाची घोषणा केली आहे.

तिमाहीदरम्यान संपादन

३.१ कंपनीने तिची संपूर्ण मालकीची उपकंपनी सोर्सपॉइन्ट, इन्कॉ.द्वारा १००% समन्याय हित प्राप्त केले आहेत आणि ०९ नोव्हेंबर, २०२१ रोजी यूएस डॉलर २७ एमएन (रु. २,०१२ एमएन)च्या खरेदी विचाराधीन (घटनापेक्ष विचाराधीन अंतर्भूत) ''दि स्टोनहिल ग्रुप, इन्कॉ.''च्या (''टीएसजी''), जॉर्जिया कॉर्पोरेशन, व्यवसायावर नियंत्रण राखले आहे. 'दि स्टोनहिल ग्रुप, इन्कॉ.''ची १९९६मध्ये स्थापना झालेली, तिचे हेडक्वॉर्टर्ड ॲटलान्ट, जॉर्जिया, यूएसए येथे आहे. यूएस मॉर्गेज इंडस्ट्रीकरिता कर्ज गुणवत्ता नियंत्रण, योग्य परिश्रमार्थी व कर्ज निर्मिती सेवा यावर प्रकाश टाकला आहे. प्रदान केलेल्या खरेदीच्या विचाराधीन रु. १७२ एमएनचे अभिज्ञात निव्वळ मत्तेच्या दर्शित मूल्याकरिता नियत वाटप करण्यात आले आहे आणि रु. ३०४ एमएनच्या अमूर्त मत्तेकरिता नियत वाटप करण्यात आले आहे आणि रु. १,५३६ एमएनचे तरतुदीय तत्त्वावर, ख्यातीमूल्याकरिता खरेदी किंमत वाटप संचलनाच्या प्रलंबित निष्कर्षावर आधारित नियत वाटप करण्यात आले आहे. समायोजन (त्यावरील विस्थगित कर समाविष्ट), जर असल्यास, मोजमापन कालावधीदरम्यान पार पाडले जाईल, ज्याकरिता कालावधी संपादन तारखेपासून एक वर्षापेक्षा अधिक नसेल.

३.२ कंपनीने तिच्या संपूर्ण मालकीची उपकंपनी फर्स्ट बिझनेस प्रोसेस सर्व्हिसेस, एलएलसी (''एफबीपीएस'')द्वारा १००% समन्याय हित प्राप्त केले आहेत आणि २९ डिसेंबर, २०२१ रोजी यूएस डॉलर ५३ एमएन (रु. ३,९४० एमएन)च्या खरेदी विचाराधीन (घटनापेक्ष विचाराधीन अंतर्भूत) ''अमेरिकन रिकव्हरी सर्व्हिस'', विधि संस्थापित व १९८६ मध्ये स्थापित झालेली, तिचे हेडक्वॉर्टर्ड थाऊझण्ड ओक्स, कॅलिफोर्निया, यूएसए येथे आहे. ती यूएसएमध्ये अग्रेसर ''बीएफएसआय'' व ''फिन्टेक क्लायन्ट्स''करिता विधि कलेक्शन सर्व्हिसेसची तरतूद करते. प्रदान केलेल्या खरेदीच्या विचाराधीन रु. ६०० एमएनचे अभिज्ञात निव्वळ मत्तेच्या दर्शित मूल्याकरिता नियत वाटप करण्यात आले आहे आणि रु. ३,३४० एमएनचे तरतुदीय तत्त्वावर, ख्यातीमूल्याकरिता खरेदी किंमत वाटप संचलनाच्या प्रलंबित निष्कर्षावर आधारित नियत वाटप करण्यात आले आहे. समायोजन (त्यावरील विस्थगित कर समाविष्ट), जर असल्यास, मोजमापन कालावधीदरम्यान पार पाडले जाईल, ज्याकरिता कालावधी संपादन तारखेपासून एक वर्षापेक्षा अधिक नसेल.

४ वरील उतारा सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेन्ट्स) रेग्युलेशन, २०१५च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजेसकडे फाइल केलेला ३१ डिसेंबर, २०२१ रोजी संपलेल्या नऊमाहीकरिता लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांचा सविस्तर प्रारूप उतारा आहे. ३१ डिसेंबर, २०२१ रोजी संपलेल्या नऊमाहीकरिता स्वतंत्र व एकत्रिकृत वित्तीय निष्कर्षांचे संपूर्ण प्रारूप www.bseindia.com व www.nseindia.com या स्टॉक एक्स्चेंजेसच्या वेबसाइट्सवर आणि www.firstsource.com या कंपनीच्या वेबसाइटवर उपलब्ध आहे.

संचालक मंडळाच्या आदेशाद्वारा
फर्स्टसोर्स सोल्यूशन्स लिमिटेडकरिता
स्वाक्षरी/-

स्थळ : मुंबई, भारत — **विपुल खन्ना**
तारीख : ०४ फेब्रुवारी, २०२२ — **व्यवस्थापन संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी**

फर्स्टसोर्स सोल्यूशन्स लिमिटेड, सीआयएन : एल६४२०२एमएच२००१पीएलसी१३४१४७
नोंदणीकृत कार्यालय : पाचवा मजला, पॅराडिगम 'बी' विंग, माइण्डस्पेस, लिंक रोड, मालाड (प.), मुंबई-४०० ०६४
टेलि. : +९१ २२ ६६६६ ०८८८ ● **फॅक्स :** +९१ २२ ६६६६ ०८८७ ● **वेबसाइट :** www.firstsource.com
ई-मेल : complianceofficer@firstsource.com

Adfactors 562

TATA

TATA STEEL LIMITED
Registered Offce: Bombay House, 24, Homi Mody Street, Fort, Mumbai - 400 001 India
Tel.: 91 22 6665 8282 • Fax No.: 91 22 6665 7724 • Email: cosec@tatasteel.com • Website: www.tatasteel.com
CIN: L27100MH1907PLC000260

सूचना

३१ डिसेंबर, २०२१ रोजी संपलेल्या तिमाही/नऊ महिन्यांसाठी अलिप्त वित्तीय निष्कर्षांचा उतारा

₹ कोटी

तपशील	३१.१२.२०२१ रोजी संपलेली तिमाही	३०.०९.२०२१ रोजी संपलेली तिमाही	३१.१२.२०२० रोजी संपलेली तिमाही	३१.१२.२०२१ रोजी संपलेले नऊ महीने	३१.१२.२०२० रोजी संपलेले नऊ महीने	३१.०३.२०२१ रोजी संपलेले आर्थिक वर्ष
	लेखापरिक्षित	लेखापरिक्षित	लेखापरिक्षित	लेखापरिक्षित	लेखापरिक्षित	लेखापरिक्षित
प्रवर्तनातून एकूण महसूल	३१,९६४.२५	३२,६८६.६२	२३,१९०.३१	९२,३४०.४२	५६,७७७.४९	८४,१३२.९२
कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर आणि अपवादात्मक बाबींपूर्वी)	१०,४४३.६६	११,७३०.४०	६,०१२.२७	३३,६११.०६	८,२७९.५८	१७,८६८.५४
कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर)	१०,२६२.६९	११,५९९.६९	५,७८६.३३	३३,४५२.०६	८,०७१.६२	१८,६०९.८४
कालावधीसाठी करोत्तर निव्वळ नफा/(तोटा)	७,६८३.३९	८,७०८.२६	४,२८५.३६	२५,१७१.७२	८,९४८.३२	१७,०७७.९७
कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीसाठी नफा/(तोटा) (करोत्तर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून)	७,८३६.९९	८,८७१.२६	४,३०२.३०	२५,५१८.९३	८,९९५.८५	१७,४८९.३८
भरणा झालेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य ₹ १० प्रति भाग)	१,२२२.३३	१,२०३.४६	१,१४६.१३	१,२२२.३३	१,१४६.१३	१,१९८.७८
पुनर्मुल्यांकित राखीव वगळून राखीव						९३,२११.३४
सिक्युरिटीज प्रिमियम रिझर्व्ह				३१,२८६.४८	२७,७८०.२८	३०,९६४.७६
नेट वर्थ	११७,२४४.१७	१०९,३७९.७१	८४,९८२.००	११७,२४४.१७	८४,९८२.००	९५,१८५.१२
भरणा झालेले कर्ज भांडवल				१३,६४८.१७	१७,३८७.२६	१३,५६७.६०
निव्वळ डेब्ट इक्विटी रेशो	०.२७	०.३२	०.३९	०.२७	०.३९	०.३२
प्रत्येकी ₹ १० ची मूलभूत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)- रुपयांत (अपवादात्मक बाबीनंतर)	६२.८८	७१.३०	३६.३८	२०६.१९	७५.५८	१४५.००
प्रत्येकी ₹ १० ची सौम्यिकृत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)- रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर)	६२.८५	७१.२५	३६.३८	२०६.००	७५.५७	१४४.९९
डिबेंचर विमोचन राखीव	२,०४६.००	२,०४६.००	२,०४६.००	२,०४६.००	२,०४६.००	२,०४६.००
डेब्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो	१६.०६	१८.१९	४.८७	१६.००	२.७२	३.६०
इंटरेस्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो	२३.१६	२२.२९	७.३९	२१.४५	३.७५	५.८१

३१ डिसेंबर, २०२१ रोजी संपलेल्या तिमाही/नऊ महिन्यांसाठी एकत्रित वित्तीय निष्कर्षांचा उतारा

₹ कोटी

तपशील	३१.१२.२०२१ रोजी संपलेली तिमाही	३०.०९.२०२१ रोजी संपलेली तिमाही	३१.१२.२०२० रोजी संपलेली तिमाही	३१.१२.२०२१ रोजी संपलेले नऊ महीने	३१.१२.२०२० रोजी संपलेले नऊ महीने	३१.०३.२०२१ रोजी संपलेले आर्थिक वर्ष
	अलेखापरिक्षित	अलेखापरिक्षित	अलेखापरिक्षित	अलेखापरिक्षित	अलेखापरिक्षित	लेखापरिक्षित
प्रवर्तनातून एकूण महसूल	६०,७८३.११	६०,३८७.१३	४१,९३५.२१	१७४,६३५.६७	१०६,४४९.०३	१५६,४७७.४०
कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर आणि अपवादात्मक बाबींपूर्वी)	१२,३५८.९८	१३,६०३.६१	५,७४६.७४	३८,२२१.६७	४,५३८.८६	१४,८८६.८५
कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर)	१२,१६५.५८	१४,११९.५७	५,५९३.१९	३८,३६१.९०	४,४८६.८३	१३,८४३.६९
कालावधीसाठी करोत्तर निव्वळ नफा/(तोटा)	९,५९८.१६	१२,५४७.७०	४,०१०.९४	३१,९१४.२०	१,०२७.८८	८,१८९.७९
कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीसाठी नफा/ (तोटा) (करोत्तर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून)	१०,४८५.४६	११,८३२.६८	२,२०४.२०	३२,७०१.००	(५,१५२.२५)	९७८.७८
भरणा झालेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य ₹ १० प्रति भाग)	१,२२१.१७	१,२०२.२८	१,१४४.९५	१,२२१.१७	१,१४४.९५	१,१९७.६१
राखीव (पुनर्मुल्यांकित राखीव वगळून) आणि अनियंत्रक व्याज						७५,५३५.८४
नेटवर्थ	१०४,१८२.७१	९१,५१८.४६	६६,८९१.५७	१०४,१८२.७१	६६,८९१.५७	७४,२३८.७७
निव्वळ डेब्ट इक्विटी रेशो	०.६८	०.७९	१.१८	०.६८	१.१८	०.९८
प्रति समभाग प्राप्ती						
प्रत्येकी ₹ १० ची मूलभूत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)- रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर)	७९.१०	९९.१६	३१.८६	२५२.४८	६.०८	६३.७८
प्रत्येकी ₹ १० ची सौम्यिकृत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत अपवादात्मक बाबींनंतर)	७९.०६	९९.०८	३१.८६	२५२.२४	६.०८	६३.७८
डिबेंचर विमोचन राखीव	२,०४६.००	२,०४६.००	२,०४६.००	२,०४६.००	२,०४६.००	२,०४६.००
डेब्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो	९.३७	११.४१	३.५९	९.०२	१.३८	२.२३
इंटरेस्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो	१२.५७	१४.९०	४.८४	११.८३	१.९५	३.३९

टीप :
सेबी (लिस्टिंग अँड अदर डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ आणि रेग्युलेशन ५२ अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजेसमध्ये सादर केलेल्या ३१ डिसेंबर, २०२१ रोजी संपलेल्या तिमाही/नऊ महिन्यांसाठी अलिप्त आणि एकत्रित वित्तीय निष्कर्षांच्या तपशीलवार विवरणाचा वरील एक उतारा आहे. ३१ डिसेंबर, २०२१ रोजी संपलेल्या तिमाही/नऊ महिन्यांसाठी अलिप्त आणि एकत्रित निष्कर्षांचे संपूर्ण विवरण स्टॉक एक्स्चेंजेसच्या वेबसाईटस् (www.nseindia.com/www.bseindia.com) आणि कंपनीची वेबसाईट (www.tatasteel.com) वर उपलब्ध आहे.

टी. व्ही. नरेंद्रन
मुख्य कार्यकारी अधिकारी आणि
व्यवस्थापकीय संचालक

कौशिक चॅटर्जी
कार्यकारी संचालक आणि
मुख्य वित्तीय अधिकारी

मुंबई : ०४ फेब्रुवारी, २०२२

TATA STEEL